**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार**
**पोलीस आयुक्त यांचे कार्यालय**
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२- २९४५१००१
**Email ID –**
**pro.cp.mbvv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक ३५१ दिनांक १७-१२-२०२१

## सराईत गुन्हेगांराना अटक करुन चोरी व घरफोडीचे एकुण ४ गुन्हे उघड करुन मुद्देमाल हस्तगत- वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण कक्षाची कामगिरी

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दि. १२/११/२०२१ रोजी ०१.०० वा. ते ०४.३० वा. चे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने गाळा नं ई/१६, नं ४५, बाँबे टॉकीज इंडस्ट्रील इस्टेट, धुमाळ नगर, वालीव, वसई पुर्व, येथील गाळयाची खिडकी उचकटुन त्यावाटे आत प्रवेश करुन एकुण ४४,०००/- रुपये किंमतीचे ४ मोबाईल व रोख रक्कम असा मुद्देमाल चोरी केल्याने फिर्यादी यांनी अज्ञात चोरटया विरुध्द वालीव पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्याने गु.रजि.क्र. १२९२/२०२१ भा.द.वि.सं. कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळावरुन मिळालेली तांत्रिक माहिती व गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे दोन आरोपीत नामे - १) प्रविण बलवंत गौरी रा. महानगर पालीक शाळेच्या बाजुला, गोखीवरे, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर. २) संदीप उमेश तिवारी उर्फ कार्टुन, रा. सनसिटी शाळेच्या समोर, वाघरळपाडा, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर. यांना दिनांक – १२/१२/२०२१ रोजी अटक करुन त्यांना विश्वासात घेवुन तपास केला असता त्यांनी सदर गुन्हयातील १६,०००/- रुपये किंमीतीचे ४ मोबाईल असा मुद्देमाल परत केला तसेच खालील गुन्हे केल्याची कबुली दिली.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नंबर व कलम |
|---|---|---|
| १. | वालीव | १२९२/२०२१ भा.द.वि.सं.कलम ४५७,३८०, ३४ |
| २. | वालीव | ९८८/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३८० |
| ३. | वालीव | १०५५/२०२१ भा.द.वि.सं. कलम ४५७,३८०, |
| ४. | वालीव | ११७९/२०२१ भा.द.वि.सं.कलम ३७९ |

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त पीरमंडळ - २, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त तुळींज विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. कैलास बर्वे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मनोज मोरे, मुकेश पवार, योगेश देशमुख, पो.ना.किरण म्हात्रे, सचिन दोरकर राजेंद्र फड, सतीश गांगुर्डे, पो. अंम. जयवंत खंडवी, गजानन गरीबे, सचीन खताल यांनी केलेली आहे.

------ooo------